नगर परिषद पुलगांव जिल्हा वर्धा

ई-मेल- pulgaonnagarparishad@gmail.com
दुरध्वनी क्रं. ०७१५८-२८२१२८ टोल फ्री नं. १८०० २३३ २६९४

जा.क्र./नपपु./बा.वि./ कावि./३२४/२०१७ दिनांक:- २२/९/१७

आदेश

संदर्भ :- मामला क्रं.०६/अकृषक आकारणी निश्चिती/ एन.ए.पी.३४/२०१५-१६ मौजा. गुंजखेडा ता. देवळी जि. वर्धा दाखल दिनांक २७/०८/२०१५.

अर्जदार श्री. प्रविण पुरुषोत्तम चांडक व इतर – २, रा. पुलगांव त. देवळी , जि. वर्धा यांनी या कार्यालयात **दिनांक १९/०८/२०१७** ला अर्ज करुन त्यामध्ये नमुद केले की, मौजा गुंजखेडा येथील **सर्व्हे क्रं. ४५३,** मधील **भूखंड क्रं. २,३,** व ४ यांचे **क्षेत्र. ७५०.८१ चौ. मी.** असुन यांचे निवासी एकत्रिकरण करावयाचे आहेत तसेच **भूखंड क्रं. ५, ६, ७ व ८** याचे **क्षेत्र ५१२.१२ चौ.मी.** असून यांचे निवासी एकत्रिकरण करुन देण्याची विनंती केली आहे.

प्रकरणी अर्जदाराने सादर केलेले नकाशे सर्वसाधारण पणे योग्य् असुन पुलगांव शहराच्या विकास आराखडया नुसार निवासी प्रयोजनार्थ सदर जागेचा विकास अनुज्ञेय आहे. सबब खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन उक्त् भूखंड निवासी एकत्रिकरण नकाशास मंजूरी आदेश देण्यात येत आहे.

१) सदरची शिफारस अनुज्ञेय निवासी वापराकरीता करण्यात येत आहे.
२) उक्त् एकत्रित भूखंडामध्ये स्वतंत्र प्रकारचे बांधकाम करणे बंधनकारक राहिल.
३) विषयांकित जागेस उक्त् क्षेत्राकरीता लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावली नुसार बांधकाम परवानगी अनुज्ञेय राहिल. तसेच संबंधीत नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम मंजूरी घेणे अनिवार्य राहिल.
४) अर्जदाराला मुळ अकृषक आदेशातील सर्व अटी जशाच्या तशा राहतील.
५) नगर रचनाकार याचे यापूर्वीचे पत्र क्रं. **१३६, दि. ३/७/१९८६** मधील अटी जशाच्या तशा लागू राहतील.
६) सदर जागेची मोजणी संबंधीत विभागाकडून करुन घेणे बंधनकारक राहिल.
७) सदर भूखंडाची खरेदी – विक्री व इतर करार होईल त्यावेळी मंजूर एकत्रिकरण [redacted] नकाशा विक्रीपत्र / कराराचा एक भाग म्हणुन जोडण्यात यावा.

नगर परिषद सील जि. वर्धा

मुख्याधिकारी
नगर परिषद पुलगांव

प्रतिलिपी :

१) मा. तहसिलदार, देवळी यांना माहिती तथा आवश्यक् कार्यवाहीस्तव्
२) मा. उपअधिक्षक भूमी अभिलेख देवळी
३) मा. नगर रचनाकार वर्धा यांना माहितीस्तव्